लोकमत पु. पान क्र. 1

## घरातून चोरला लॅपटॉप



**नालासोपारा :** संतोष भवनच्या शर्मा वाडी येथील अशोक यादव चाळीत राहणाऱ्या दीपक यादव (२२) या तरुणाच्या घरातून लॅपटॉप चोरीला गेला आहे. शुक्रवारी रात्री चोरट्याने घराची खिडकी उघडून २५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेला आहे. तुळींज पोलिसांनी शनिवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेची फसवणूक

**नालासोपारा :** टाकी रोडवरील आंबेडकर नगर येथे राहणाऱ्या जेसी रॉड्रीक्स (५९) यांची बतावणी करून फसवणूक केली आहे. त्या शनिवारी संध्याकाळी सव्वाचारच्या सुमारास चेतन बार ते केएमपीडी कॉलेजच्या रोडवरून जाताना त्यांना रस्त्यात दोघे जण भेटले. त्यांनी जेसी यांना त्यांच्याजवळील ५ लाख रुपयांचे कागदी खोटे बंडल देऊन त्यांच्या गळ्यातील १ लाख रुपये किमतीची दीड तोळे वजनाची सोन्याची चेन खोटी बतावणी करून काढून घेऊन ते फसवून गेलेत. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## शॉक लागून तरुणाचा मृत्यू



**नालासोपारा :** वसईच्या भोयदापाडा येथे राहणाऱ्या शादाब खान (२८) या तरुणाचा शॉक लागल्याने मृत्यू झाला आहे. शनिवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास भोयदापाडा नाक्यावरील दास सर्व्हिस सेंटर येथे गाडी धूत असताना त्याला इलेक्ट्रिक शॉक लागला. त्याला उपचारासाठी नवघर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेल्यावर तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. वालीव पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

# शौचालयांना रात्री टाळे; नागरिकांनी जायचे कुठे?

## भाईंदरमधील रहिवाशांची कुचंबणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या काही भागातील मीरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक शौचालयांना रात्री १२ नंतर टाळे मारले जात असल्याने रहिवाशांची कुचंबणा होत आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेची शहरामध्ये सुमारे दीडशेपेक्षा जास्त सार्वजनिक शौचालये आहेत. ही शौचालये मुख्यत्वे शहरातील झोपडपट्टी भागात आहेत. या शौचालयांची देखभाल दुरुस्ती व दैनंदिन साफसफाई महापालिकेच्या माध्यमातून ठेकेदार करीत आले आहेत. तसेच या शौचालयांचे दैनंदिन संचालनदेखील ठेकेदारामार्फत केले जात होते.

सार्वजनिक शौचालय ही विशेषत: झोपडपट्टी भागातील नागरिकांची नैसर्गिक विधीसाठीची अत्यावश्यक बाब आहे. त्यामुळे सार्वजनिक शौचालये २४ तास उघडी ठेवणे आवश्यक आहे.

### आंदोलनाचा इशारा

१ ही शौचालये मध्यरात्री १२ ते पहाटे ५ वाजेपर्यंत बंद ठेवली जातात. रात्रीच्या वेळी १२ वाजल्यापासून ते पहाटे ५ वाजेपर्यंत सार्वजनिक शौचालये बंद असल्याने येथील रहिवाशांना त्यातही विशेषत: महिलांना शौचालयास जायचे असल्यास मोठी कुचंबणा होते.

२ नाइलाजाने सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर शौचास जावे लागते. रात्रीच्या वेळी उघड्यावर शौचास जाणे धोकादायक असतेच; पण, महिलांना खूपच जाचक ठरते.

३ शौचालये २४ तास उघडी असणे आवश्यक आहे; पण पालिकेच्या दुर्लक्षामुळे या भागातील शौचालये नियमबाह्यपणे बंद केली जातात.

४ महापालिकेकडे तक्रार केली असून, सार्वजनिक शौचालये २४ तास उघडी न ठेवल्यास आंदोलन केले जाईल, असे भाजपचे उत्तन मंडळ अध्यक्ष शैलेश म्हामुणकर यांनी सांगितले.

लोकमत पू. पान क्र. 3

# विरारला तीन कामगारांचे मोबाइल चोरले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या जकात नाका येथील बांधकाम चालू असलेल्या म्हाडाच्या नव्या क्रीडा संकुलमध्ये काम करणाऱ्या तीन कामगारांच्या खिशातून मोबाइल चोरीची घटना घडली आहे.

शुक्रवारी रात्री प्रशांत स्वरूप (३५), मेव्हणा धर्मवीर आणि सासरे कृष्णा हे झोपले होते. त्यावेळी आरोपीने तिघांचे आठ हजारांचा एक, पाच हजारांचा एक आणि १६,५०० रुपये किमतीचा एक असे २९,५०० रुपये किमतीचे तीन मोबाइल चोरून नेले आहेत. बोळींज पोलिसांनी शनिवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पू. पान क्र. 4

# अतिरिक्त आयुक्तांना दमदाटी व शिवीगाळ

## पालिकेचे कर्मचारी आज करणार निषेध

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई-विरार मनपा मुख्यालयात शुक्रवारी दुपारच्या वेळेत अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या केबिनमध्ये आगरी सेनेच्या काही कार्यकर्त्यांनी विनापरवानगी घुसून दमदाटी व शिवीगाळ केली. यावेळी त्यांना जिवे मारण्याची धमकी देऊन धक्काबुक्की करण्याचा तसेच कार्यालयातील साहित्याची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला.

अतिरिक्त आयुक्त यांच्या शेजारी असलेल्या मनपा आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ व दमदाटी केली.

घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी मनपा मुख्यालयातील महासभा सभागृहात आयुक्त अनिलकुमार पवार उपस्थितीत जाहीर निषेध सभा घेतली. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अशा प्रकारे विनाकारण, हेतुपुरस्सर धमकावणे व शिवीगाळ करण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कडक कारवाई करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. संबंधितांची तक्रार करण्याचे ठरविण्यात आले. या घटनेचा निषेध म्हणून सोमवारी सर्व मनपा कर्मचाऱ्यांमार्फत हाताला काळी फीत बांधून निषेध करण्यात येणार आहे.

CS CamScanner

लोकमत पु. पान क्र. 1

पोलिसांच्या देखरेखीखाली नियंत्रण कक्ष

# मीरा रोडच्या नयानगर भागात १४८ सीसीटीव्हींची नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या नयानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १४८ सीसीटीव्ही कॅमेरे विविध हालचालींवर नजर ठेवून आहेत. त्याचा नियंत्रण कक्ष नयानगर पोलिसांच्या देखरेखीखाली सुरू झाला आहे.

मीरा रोडमधील नयानगर पोलिस ठाणे परिसर संमिश्र धर्म-जातीच्या नागरिकांच्या लोकवस्तीचा आहे. वाढत्या शहरीकरणासह या भागात गुन्हे, गुन्हेगारी प्रवृत्तीसुद्धा सक्रिय आहे. काही गुन्हे तर अतिशय गंभीर स्वरूपाचे घडले आहेत. त्यातच गेल्या दोन वर्षांपासून काही भागात धार्मिक तणावाचे वातावरण झाले होते.

नयानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांच्या सुरक्षेसह पोलिसांचा वॉच राहावा, याकरता आमदार गीता जैन यांनी मूलभूत सोयी-सुविधा विकास योजनेंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केली होती. त्यासाठी किती आणि कोणत्या प्रकारच्या सीसीटीव्हीची आवश्यकता आहे, कोणते प्रमुख नाके, परिसर आदींचा अहवाल तयार केला गेला होता.

सीसीटीव्ही कॅमेरे आणि नियंत्रण कक्षाचे लोकार्पण आमदार गीता जैन यांच्या हस्ते केले गेले. यावेळी महापालिका आयुक्त संजय काटकर, पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहायक आयुक्त विजयकुमार मराठे, नयानगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे, माजी नगरसेवक अश्विन कासोदरिया, डॉ. सुरेश येवले, नारायण नांबियार आदी उपस्थित होते.



नयानगरमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून करडी नजर ठेवली जात आहे.

## कायदा, सुव्यवस्थेबरोबरच नागरिकांची सुरक्षा महत्त्वाची

शहराच्या विकासासोबतच कायदा, सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षा तितकीच महत्त्वाची असून आधी उत्तन सागरी पोलिस ठाणे हद्दीत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे. गुन्ह्यांची उकल होण्यासह गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध पुरावा म्हणून सीसीटीव्ही उपयोगी पडतील, असे आ. जैन यांनी सांगितले.

## ४४ ठिकाणी बसवले कॅमेरे

शासनाने सीसीटीव्हीसाठी २ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निधीतून नयानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ४४ वेगवेगळ्या ठिकाणी एकूण १४८ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. यात ६ ठिकाणी एएनपीआर कॅमेरे, ५ ठिकाणी पीटीझेड कॅमेरे आणि इतर प्रकारचे कॅमेरे पोलिसांच्या आवश्यकतेनुसार बसवण्यात आले आहेत.

पुढारी पान क्र. 6

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघातांची मालिका

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे अपघात वाढले आहेत. सध्या व्हाईट टॉपिंगचे काम सुरू आहे. या दरम्यान मार्गावर वाहनचालकांचे नियंत्रण सुटून अपघातात वाहनचालकांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान गुरुवारी व्हाईट टॉपिंग आणि जुन्या रस्त्याच्या दरीत घसरल्याने त्याचवेळेस भरधाव आलेल्या ट्रक खाली सापडून दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर ट्रक चालकाने तेथून ट्रकसह पळ काढला आहे.

पहाटेच्या सुमारास एका तरुण दुचाकीस्वाराचा दुचाकी व्हाईट -टॉपिंग आणि डांबरी रस्त्यावरील खड्ड्यामध्ये अडकल्याने त्याचा मृत्यू झाला. यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) वाहनधारकांना सावध न करता व्हाईट टॉपिंगचे काम अपूर्ण ठेवले असल्याचा आरोप होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नायगाव येथील ससूनवघर गावाजवळील अशोक लेलँड गोदामासमोर हा अपघात झाला. कार्यालयातून घरी परतत असतांना झालेल्या या अपघातातील मृताचे नाव एल्टन यूजीन फर्नांडिस असे होते.

नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बलराम पालकर यांनी सांगितले की, फर्नांडिस हा त्याच्या एमएच ४८ सीझेड १०३५ क्रमांकाच्या हिरो होंडा मोटारसायकलवरून जात होता. फर्नांडिस जेव्हा गोदामाजवळ पोहोचला तेव्हा तो रस्त्याच्या कडेला असलेल्या व्हाईट टॉपिंगच्या बाजूला होता. त्याने त्या भागातून उतरण्याचा प्रयत्न केला असता त्याच्या दुचाकीचा टायर सिमेंटचा भाग आणि डांबरी रस्ता यांच्यातील दरीमध्ये अडकला, त्यामुळे दुचाकी घसरली. त्यामुळे फर्नांडिस हे पडले आणि दुचाकीला समांतर जाणाऱ्या ट्रकखाली चिरडले गेले. वेग आणि अंधारामुळे ट्रेलर चालकाला दुचाकीस्वार घसरल्याचे लक्षात आले नाही. ट्रेलर चालकाने फर्नांडिसला कोणतीही वैद्यकीय मदत न देता किंवा न थांबवता तेथून पळ काढला. ट्रेलर चालकावर गुन्हा दाखल केला आहे, असे पालकरांनी सांगितले.

पुढारी पान क्र. ३

# महिलेला शिवीगाळ केल्याप्रकरणी अॅट्रॉसिटी अतंर्गत गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका ४१ वर्षीय महिलेला शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने लहान मुलांच्या भांडणावरुन महिलेच्या घरी जावून महिलेचा विनयभंग करून जातीवाचक व अश्लिल शिवीगाळ केल्या प्रकरणी अॅट्रॉसिटी कायद्या खाली काशीमिरा पोलीस ठाण्यात ९ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास मिरारोड विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. अमर मराठे हे करत आहेत. यातील मुख्य फरार आरोपीला काशीमिरा पोलिसांनी तीन महिन्यानंतर अटक केली आहे.

या महिलेला त्यांच्याच इमारतीत राहणाऱ्या अकबर शेख व त्यांच्या दोन मुलांनी पीडिता यांच्या व त्यांच्या मुलांना मारुन टाकण्याची धमकी देत, अश्लील व जातीवाचक शिवीगाळ केली होती. यापूर्वी देखील पीडिता व आरोपी यांच्यात भांडण झाल्याने पीडिता यांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. त्याच इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील जिन्या शेजारील गॅलरीत पीडितेचा मुलगा हा थांबलेला असताना आरोपी याने त्याच्या भावाबरोबर झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन त्याला शिवीगाळ करुन दमदाटी केली. त्यानंतर त्याठिकाणी आरोपी व त्यांचे वडील अकबर शेख व मोठा भाऊ हे तिघे पीडिता यांच्या मुलाला घेवुन पीडितेच्या घरामध्ये गेले. घरामध्ये मुलाला मारहाण करण्यासाठी आलेले असताना पीडिता यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता मुख्य आरोपी याने पीडितेच्या अंगावर हात टाकुन पीडितेला धक्काबुक्की केली व अश्लील भाषेत व जातीवाचक शिवीगाळ केली, तसेच पीडिता व कुटुंबियांना मारून टाकण्याची धमकी दिली.

याप्रकरणी ९ जुलै रोजी काशीमीरा पोलिस ठाण्यात अॅट्रॉसिटी व महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील दोन आरोपी हे एक १३ वर्ष व दुसरा १६ वर्षाचा असे लहान असल्यामुळे त्यांना दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर भिवंडी बाल न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. यातील मुख्य आरोपी मागील तीन महिन्यापासून फरार होता. आरोपी अकबर शेख (३८) याला मिरारोडचे सहाय्यक पोलीस आयुक्त तथा तपास अधिकारी डॉ. अमर मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली काशीमिरा गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सहायक पोलिस उपनिरीक्षक योगेश काळे व पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे यांनी व त्यांच्या पथकाने तपास करून तेलंगणा राज्यातील हैद्राबाद येथून ११ ऑक्टोबर रोजी अटक केली आहे.

CamScanner

म.टा.पु. पान क्र. 1

# शिवसेनेचा भाजपच्या बालेकिल्ल्यावर दावा



म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

- मिरा-भाईंदरची जागा लढवण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी
- शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून ठराव मंजूर

भाजपचा बालेकिल्ला असणाऱ्या मिरा-भाईंदरच्या जागेवर आता शिवसेना शिंदे गटाकडून जाहीर दावा करण्यात आला आहे. ही जागा महायुतीत शिवसेनेने लढवण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. तसा ठरावच शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी मंजूर केला आहे. त्यामुळे निवडणुका तोंडावर असताना मिरा-भाईंदरच्या जागावाटपावरून महायुतीत गुंतागुंत वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिरा-भाईंदरला मागील १० वर्षांपासून ठाणे जिल्ह्यातील भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखले जाते. सन २०१४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे नरेंद्र मेहता यांनी राष्ट्रवादीच्या गिल्बर्ट मेन्डोन्सा यांना पराभूत करून निवडणूक जिंकली होती. सन २०१७मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीतही भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. तसेच, २०१९च्या विधानसभा निवडणुकीत भाजप पदाधिकाऱ्यांच्या बळावर अपक्ष आमदार गीता जैन निवडून आल्या होत्या.

या मतदारसंघात पूर्वीपासूनच शिवसेनेचे फारसे अस्तित्व नाही. शिवसेनेच्या फुटीनंतरही फारशी ताकद त्यांना जमवत आलेली नाही. याचा विचार करता ही जागा आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीत भाजपच्याच वाट्याला येणार, असे मानले जात आहे. असे असताना शिवसेनेकडून मतदारसंघातील विविध प्रश्नांना हात घालणे, कार्यक्रमांचे आयोजन आदी मार्गांनी मोर्चेबांधणी सुरू करण्यात आली होती. त्यातच आता शिवसेनेकडून मिरा-भाईंदर मतदारसंघावर दावा ठोकण्यात आला आहे. ही जागा महायुतीत शिवसेनेने लढवावी, अशी मागणी ठराव मंजूर करत, जिल्हाप्रमुख राजू भोईर यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे. मिरा-भाईंदरमध्ये राज्य सरकारकडून विविध विकासकामे करण्यात आल्याने शिवसेनेकडे नागरिकांचा कल वाढला आहे. सर्वेक्षणातदेखील ही जागा शिवसेना जिंकू शकते, असे दिसत असल्याचे सांगत त्या आधारे हा दावा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच, एका स्थानिक पदाधिकाऱ्याला उमेदवारी देण्याची मागणीही केली आहे.

### भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

भाईंदरमध्ये सर्वाधिक भाजपचे नगरसेवक असून काँग्रेससह इतर पक्षांच्या काही माजी नगरसेवकांचाही भाजपला पाठिंबा आहे. यापूर्वी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून मित्रपक्ष असणाऱ्या भाजप पदाधिकाऱ्यांना डावलण्याचे किंवा दाबण्याचे अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. यातच आता शिवसेनेने जागा लढवण्याचा दावा केल्याने भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. तसेच, ही जागा भाजपला मिळेल, असा विश्वासही त्यांच्याकडून व्यक्त केला जात आहे.

## हत्येप्रकरणी सासूला अटक

मिरा रोड : नयानगरमधील भररस्त्यात पत्नीच्या हत्याप्रकरणात मृत महिलेच्या सासूला पोलिसांनी अटक केली आहे. शबिना अजीज खान (६५) असे या महिलेचे नाव आहे. मृत महिलेच्या भावाच्या तक्रारीनंतर ही अटक करण्यात आली. अमरीन खान या महिलेची हत्या तिच्या पतीने केली होती. अमरीन व तिचा पती नदीम यांच्यात वाद सुरू होता. या हत्येला व पती-पत्नीमधील वादाला नदीमची आई जबाबदार असल्याची तक्रार अमरीन यांच्या भावाने केली होती. नदीमला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

नवाकाळ पान क्र. ३

# पहिल्या महिन्यापासूनच गर्भवती
# महिला पोलिसांना साडी नेसता येणार

■ मुंबई

**राज्यातील** गर्भवती पोलिसांना शर्ट-पॅन्टच्या गणवेशाऐवजी साडी नेसण्याची चार महिन्यांनंतर मिळणारी सवलत आता पहिल्या महिन्यापासूनच देण्याचा निर्णय राज्याच्या गृह विभागाने घेतला आहे. अर्थात, त्यासाठी या महिला कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.



राज्याच्या गृह विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार गर्भधारणेच्या पहिल्या महिन्यापासून १६ आठवड्यांचा काळ महिलांसाठी महत्त्वाचा आणि कसोटीचा असतो. या नाजूक काळात त्यांनी पोटावर पट्टा धारण केला तर गर्भावर अनावश्यक ताण येऊन गर्भपात होण्याची शक्यता असते, असा अभिप्राय पोलीस शल्यचिकित्सक आणि पोलीस रुग्णालयांसह सर्व पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून गृहविभागाला पाठविण्यात आला होता. त्याचा विचार करून आता १६ आठवड्यांनंतर दिली जाणारी साडी नेसण्याची सवलत आता पहिल्या महिन्यापासून करण्यात आली आहे.

# वसईच्या नायगाव-कोळीवाडा
# स्मशानभूमीची दयनीय अवस्था

**मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यसंस्कार**

■ वसई

**नायगाव** कोळीवाडा येथील स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. याठिकाणी दहन करण्याच्या ठिकाणी पत्रे नसल्यामुळे नागरिकांना पावसाळ्यात अंत्यविधी करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या स्मशानभूमीत वीजपुरवठा खंडित झाला की इन्व्हर्टर किंवा रिचार्जेबल बल्बची सोय नसल्याने मोबाईलच्या टॉर्च किंवा स्कूटरच्या हेडलाइटवर अंत्यविधी करावा लागत असल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

वसई-विरार शहर पालिकेच्या हद्दीत येणाऱ्या नायगाव कोळीवाडा येथील स्मशानभूमीची दयनीय अवस्था झाली आहे. मागील एक ते दीड महिन्यांपासून ही परिस्थिती अशीच आहे. यावर अद्यापही दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नसून वसई-विरार मनपा या स्मशानभूमीकडे दुर्लक्ष करता असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान नायगाव कोळीवाड्यातील एक मृतदेह अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत नेतेवेळीच वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे स्मशानभूमीत खूप अंधार पसरला. त्यामुळे मोबाईलच्या टॉर्चवर मृतदेह स्मशानभूमीत नेऊन काळोखात मोबाईलच्याच टॉर्च व स्कूटरच्या हेडलाइटवर अंत्यविधी करावा लागला. या घटनेमुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

N.B.T. पान क्र. 2

### शिवसेना के मीरा-भाईदर विधानसभा सीट पर दावे से बीजेपी नाराज

# मीरा-भाईदर में बीजेपी-शिवसेना (शिंदे) फिर आमने-आमने

■ अमित तिवारी, मीरा-भाईदर

बहुत दिन की शांति के बाद एक बार फिर से मीरा-भाईदर मे बीजेपी और शिवसेना (शिंदे) आमने-सामने है। मीरा-भाईदर विधानसभा (145) सीट पर शिवसेना (शिंदे) के दावे के बाद अब शिवसेना विधायक प्रताप सरनाईक की सीट (ओवला-माजीवाडा-146) पर बीजेपी ने भी अपनी नजरे गड़ा दी है। ओवला-माजीवाडा सीट पर बीजेपी उम्मीदवार के प्रत्याशी की मांग कर दी है। इस बारे मे बीजेपी युवा मोर्चा के महामंत्री रणवीर वाजपेयी ने प्रदेश अध्यक्ष को एक पत्र भी लिखा है। बीजेपी से चार बार नगरसेवक रहे मदन सिंह ने भी मीरा-भाईदर और ओवला-माजीवाडा सीटो से उम्मीदवार देने की मांग कर दी है। मदन सिंह ने कहा कि मीरा-भाईदर शहर बीजेपी का गढ़ है और यहां पर शिवसेना की जीत बीजेपी के कारण होती है।

## नाईक या गहलोत को उम्मीदवारी की मांग


मीरा-भाईदर विधानसभा सीट पर शिवसेना ने ठोका दावा

रणवीर वाजपेयी का कहना है कि ओवला-माजीवाडा सीट पर सबसे ज्यादा नगरसेवक (पूर्व) बीजेपी के है। पूर्व सांसद संजीव नाईक और पूर्व उपमहापौर हसमुख गहलोत जन-जन मे लोकप्रिय है, इसलिए इन दोनो मे से किसी एक को उम्मीदवारी देनी चाहिए। बीजेपी जिलाध्यक्ष किशोर शर्मा पहले की कह चुके है कि शहर मे बीजेपी का वर्चस्व है।

## सोशल मीडिया पर भिड़े भाजपाई-शिवसैनिक

मीरा-भाईदर सीट पर शिवसेना के दावे के बाद रविवार को सोशल मीडिया पर बीजेपी और शिवसेना के कार्यकर्ता भीड़ गये। जहा शिवसैनिको ने विक्रमप्रताप का समर्थन किया, तो वही बीजेपी कार्यकर्ताओ ने इसे गैर-जरूरी और अव्यवहारिक बताया। सूत्र बताते है कि सोशल मीडिया की बहस गाली-गलौज तक पहुंच गई। शिवसेना के एक नेता ने बीजेपी के एक नेता को फोन पर अपशब्द कह डाले। बीजेपी नेता ने इसकी शिकायत करने का मन बनाया है। इससे साबित होता है कि यहा स्थिति ठीक नही है।

# नकली नोट देकर ठग ली सोने की चेन

■ निस, नालासोपारा: तुलिज पुलिस स्टेशन क्षेत्र के तुलिज रोड स्थित केएमपीडी स्कूल के सामने दिन दहाड़े दो अज्ञात लोगो ने महिला को नकली नोटो की गड्डी देकर एक लाख कीमत की सोने की चेन ठग ली और फरार हो गए। जानकारी के अनुसार, टाकी रोड स्थित आंबेडकर नगर निवासी जेसी कुशीसर रॉड्रिग्स के पास दो लोग आए और कहा कि उनके पास 5 लाख रुपए है। उन्होने महिला को नकली नोट देकर चेन ले ली।

नवभारत पृ. पान क्र. 4

भायंदर शहर के उत्तन गांव का मामला, आरोपी को मिला संदेह का लाभ

# अपहरण, बलात्कार के मामले से बरी

■ **भाईंदर** (सं). विशेष पोक्सो अदालत ने संदेह का लाभ देते हुए भायंदर के उत्तन में एक झोपड़पट्टी में रहने वाले 26 वर्षीय व्यक्ति को अपहरण, बलात्कार व पोक्सो मामले से बरी कर दिया है. विशेष न्यायाधीश रूबी यू मालवणकर ने कहा कि अभियोजन पक्ष कथित आरोपी संतोष मालू बिज के खिलाफ आरोपों को साबित करने में विफल रहा है, जिसे संदेह का लाभ दिए जाने की आवश्यकता है और इसलिए उसे बरी किया जाता है. अभियोजन पक्ष की तरफ से पेश हुए विशेष लोक अभियोजक ने अदालत को बताया कि 11 अप्रैल, 2018 को 17 वर्षीय पीड़िता उस स्थान से लापता हो गई थी, जहां वह नौकरानी के रूप में काम कर रही थी. उसके पिता ने पुलिस में शिकायत दर्ज कराई.

## झोपड़पट्टी में मिली थी लापता नाबालिग बच्ची

पीड़िता को उत्तन की एक झोपड़पट्टी में पाया गया और उसके बयान के आधार पर पुलिस ने अपहरण, बलात्कार, धमकी देने आदि की प्राथमिकी दर्ज की. बचाव पक्ष की ओर से पेश हुए वकील रामराव जगताप ने पूरे मामले का विरोध किया और कथित अपराध में कथित आरोपी की संलिप्तता से पूरी तरह इनकार किया. अभियोजन पक्ष और बचाव पक्ष की दलीलों और सबूतों पर चर्चा करने के बाद न्यायाधीश ने निष्कर्ष निकाला कि अभियोजन पक्ष आरोपी के खिलाफ आरोप साबित करने में विफल रहा है. न्यायाधीश ने कहा कि पीड़िता ने दावा किया है कि उसे आरोपी के रिश्तेदार के घर ले जाया गया और कई बार उसके साथ बलात्कार किया गया. हालांकि, उसकी गवाही से सहमति से संबंध और



आरोपी से शादी करने की इच्छा का पता चला. ऐसी परिस्थितियों में पीड़िता की फोरेंसिक जांच की रिपोर्ट के रूप में रिकॉर्ड पर मौजूद मेडिकल साक्ष्य, जिसमें 6 बजे की हाइमनल पुरानी दरार का पता चलता है, निश्चित रूप से यह दर्शाता है कि पीड़िता और आरोपी के बीच यौन संबंध थे. हालांकि, उनके बीच शारीरिक संबंध को जबरन या उसकी इच्छा के विरुद्ध नहीं कहा जा सकता है.

NBT
संडे नवभारत टाइम्स

# मीरा रोड के नया नगर में लगे 148 CCTV कैमरे



■ निसं, मीरा-भाईंदर: नया नगर पुलिस क्षेत्र में 148 नए सीसीटीवी कैमरे लगाए गए हैं। विधायक गीता जैन ने इसका उद्घाटन किया। इस मौके पर मनपा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, डीसीपी प्रकाश गायकवाड, नया नगर के सीनियर पीआई विलास सुपे भी मौजूद थे। 148 कैमरों में 6 एएनपीआर कैमरे, 5 पीटीजेड कैमरे शामिल हैं। इन कैमरों की मदद से रात के समय में भी आसानी से घटनाओं को रिकॉर्ड किया जा सकता है। जैन ने बताया कि वह शहर की सुरक्षा को लेकर प्रयासरत हैं और सीसीटीवी कैमरों के लिए 2.60 करोड़ दिए गए हैं।

● अमित तिवारी

https://web.whatsapp.com

The Free Press Journal

# Shinde Sena camp throws hat in ring

**MIRA-BHAYANDAR**

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Amidst the fine-tuning of seat-sharing, Shiv Sena (Shinde) unit has thrown its hat in the ring for the Mira-Bhayandar assembly constituency which is currently held by Mahayuti-backed Independent legislator Geeta Jain. Apart from Jain, two others, including former BJP legislator Narendra Mehta and former city chief Advocate Ravi Vyas, are already entangled in a fierce competition by staking their claim to bag the BJP candidature.

Meanwhile, office-bearers of the local unit unanimously passed a resolution staking claim over the seat and proposing the name of Vikram Pratap Singh, who is considered to be a close confidante of Pratap Sarnaik. The resolution has been sent to Chief Minister Eknath Shinde.

To justify their claim, the resolution signed by main office-bearers state that owing to the successful implementation of a slew of big-ticket projects under the leadership of Sarnaik in the twin-city and various citizen friendly schemes floated by the Shinde-led government, the influence of Shiv Sena has significantly increased among the masses in the past three years. The resolution further exudes confidence of victory if the seat is wrestled by the Shiv Sena.